
दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९९ ●शनिवार, दि.१८ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रुपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



## 'ओबीसी डीएनए' म्हणणाऱ्यांकडून दगा
# बीडमधून भुजबळांचा महाएल्गार
## मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर नाव न घेता टीका

बीड । प्रतिनिधी

ओबीसींच्या न्याय्य हक्कांच्या लढाईची मशाल क्रांतिकारी बीड जिल्ह्यातून प्रज्वलित करण्यात आली आहे. आता आपल्या ताटातील कुणाला द्यायचे नाही. यासाठी ओबीसी एकजूट होणे गरजेचे आहे. आपल्यातील वादविवाद दूर करून आपल्यात घुसखोरी करणाऱ्या बोगस कुणबी मराठ्यांना 'ओबीसी' आरक्षणातून हद्दपार करण्यासाठी ही लढाई आहे. 'ओबीसी डीएनए म्हणणाऱ्याकडूनच दगाफटका झाला आहे. असा घणाघाती आरोप 'ओबीसीं'चे नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता केला. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलात शुक्रवारी ओबीसी महाएल्गार मेळावा झाला. मेळाव्याला मार्गदर्शन करताना मंत्री भुजबळ बोलत होते. आमदार धनंजय मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, मनोज कायंदे, प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, संजय दोंड यांच्यासह समाजातील नेते, पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. आरक्षण म्हणजे गरिबी हटाव मोहीम नव्हे. आरक्षण हे समाजातील मागासलेपण दूर करण्यासाठी असते. मात्र एक व्यक्ती आणि सम ाजातील काही चोरांना सोबत घेऊन शासनावर दबाव टाकत मराठा समाजाता हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भातील 'जीआर' काढण्यात आला. 'जीआर' वर आरक्षण मिळत नसते. त्यामुळे शासनाने काढलेला जीआर तत्काळ रद्द करून ओबीसींवर ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● मुंडेंची जरांगेवर टीका

धनंजय मुंडे यांनी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्यावर हल्लाबोल केला. विधानसभा निवडणुकीत काही लोक मला पाडण्याबाबत सांगत होते. पण त्यांना सांगा मी दीड लाखांच्या मताधिक्याने निवडून आलो आहे. आमच्या ताटातील कुणी घेत असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. गावगाडातील मराठा–ओबीसी बांधव एकोप्याने राहत असताना शेजारील अंतरवली सराटीतील (जि. जालना) पाटलाने मराठा ओबीसीतील अंतर वाढविल्याचा आरोपही त्यांनी केला.




### ● पंकजा मुंडेची गैरहजेरी

ओबीसी आरक्षण बचाव महाएल्गार मेळावा बीडमध्ये असताना मंत्री पंकजा मुंडे उपस्थित नव्हत्या त्यामुळे हा विषय चर्चे चा मुद्दा ठरला. दरम्यान, बीड पोलिसांनी मेळावा परिसरात तगडा बंदोबस्त तैनात केला होता.

### ● कोण काय म्हणाले ?

- ओबीसींनी कोणाला घाबरायचे नाही. कुणी अंगावर आले तर शिंगावर घ्यायचे : धनंजय मुंडे
- क्रांतिकारी बीड जिल्ह्यातून ओबीसी आरक्षण बचाव'ची मशाल पेटविली आहे : गोपीचंद पडळकर
- चोथी नापास जरांगे शासनाला शिकवतोय शासनाने आमच्या हक्काच्या आरक्षणाचे संरक्षण करावे: गोपीचंद पडळकर

## जिल्हा जातपडताळणी समिति तर्फे त्रुटी पुर्तता अभियान राबवत गरजुंना प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून काही ना काही तांत्रिक त्रुटींमुळे अनेक गरजुंचे जातपडताळणी प्रमाणपत्र प्रलंबित राहिले होते. त्यामुळे अनेक होतकरु विद्यार्थी, नोकरदार यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत, कामे प्रलंबित राहिले होते. अशा सर्व गरजुंचे हित साध्य व्हावे, त्यांची प्रलंबित कामे मार्गी लागावीत, प्रशासकीय कारवाई गतिमान व्हावी, त्याचा थेट लाभ सामान्य नागरिकांना व्हावा, या उदात्त कर्तव्य सेवाभावनेतुन बीड जिल्हा जात पडताळणी समितीने स्वत: पुढाकार घेऊन माहे जानेवारी २०२५ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान सलग विविध शिबिर व अभियानांतर्गत गरजुंकडुन जागेवर त्यांच्या जवळजवळ १८,००० पैकी १७,००० संचिकेतील त्रुटी दूर करून त्यांना त्यांचे जातपडताळणी प्रमाणपत्र वाटप केले. आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या विविध प्रवर्गातील शेकडो जातींना आरक्षणाचा लाभ मिळुन शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी त्या त्या जातींना त्या त्या प्रवर्गाच्या विहित प्रमाणात आरक्षणाचा लाभ भेटतो. पण, त्यासाठी सगळ्यात महत्त्वाची असते ती, सदरील लाभार्थी हा त्याने प्रस्तावित केलेली स्वत:ची जात ही त्याची खरोखर असुन तो त्या जातीचा नागरिक असुन त्या प्रवर्गातील आरक्षण त्याला देण्यास हरकत नाही, या बाबीला कागदोपत्री पुरावा म्हणून सिद्ध करणारे जातपडताळणी प्रमाणपत्र. त्यामुळे, जिल्हाभरातुन हजारो नागरिक दररोज जातपडताळणी प्रमाणपत्रासाठी आपला प्रस्ताव जिल्ह्याच्या जातपडताळणी कार्यालयात सादर करतात.

शासनाचे सर्व निकष, नियम, व निर्देशानुसार संबंधित प्रस्तावाची पुर्णत: पडताळणी करुनच मग सदरील जात पडताळणी प्रमाणपत्र सदरील लाभार्थ्यांना दिले जाते.

▶▶ उर्वरित पान २ वर

## 'स्वाराती' संस्थेकरीता अभ्यागत मंडळ; अध्यक्षपदी खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती

### ● राज्य सरकारचा निर्णय

बीड । प्रतिनिधी



स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आले आहे. या मंडळाच्या अध्यक्षपदी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा निर्णय राज्य शासनाच्या वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वतीने काढला आहे. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अंबाजोगाई या संस्थेत अंमलात असलेले नियम व आदेश यांच्या चौकटीमध्ये राहून रुग्णालयाच्या व्यवस्थापनांत सुधारणा करण्यासाठी मार्ग व साधने तयार करणे, निरनिराळ्या कामासाठी व विभागांसाठी मंजूर केलेल्या आर्थिक तरतूदींचा योग्य प्रकारे वापर होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे. रुग्णालय संबंधिच्या जनतेच्या तक्रारीचा अभ्यास करणे व त्याचे निवारण होण्यासाठी करावयाच्या पध्दतीबद्दल शिफारस करणे, रुग्णालयातील कर्मचारी वर्गाची अनियमित उपस्थिती, अवक्तशीरपणा व गैरवर्तन इत्यादींबाबत आढावा घेणे व त्यांत सुधारणा व्हावी म्हणून शिफारस करणे. रुग्णालय परिसराची तपासणी करणे, सर्वसाधारण काम काजांचा अभ्यास करणे व दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी उपाय सुचविणे. रूग्णालयासाठी जनतेकडून देणग्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडचा नगराध्यक्ष भाजपचाच होणार: देशमुख– मुंदडा–लोढा



बीड । प्रतिनिधी

स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी अत्यंत परिश्रमाने आणि संघटन कौशल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वस्ती तांड्यावर भारतीय जनता पार्टी पोहोचवली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन तथा वातावरणीय बदल मंत्री लोकनेत्या पंकजाताई साहेब मुंडे या महाराष्ट्रभर विविध यात्रेच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचा विचार शेवटच्या घटका पर्यंत पोचविण्यासाठी अथक परिश्रम करत आल्या आहेत व त्याना सम र्थपणे ▶▶ उर्वरित पान २ वर

## कारवाया गुलदस्त्यात, अन्नसुरक्षा अधिकारी अनुराधा भोसलेंची वसुली मात्र जोमात

● व्यापारी महासंघ आज घेणार जिल्हाधिकाऱ्यांची भेट
● शासनाची गाडी न वापरता स्वत: च्या गाडीतून जिल्हाभरात कारवाया



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अन्नभेसळ विभागातील काही अधिकाऱ्यांकडून तपासणीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक वसुली सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, अन्नसुरक्षा अधिकारी अनुराधा भोसले यांनी शासनाची गाडी न वापरता स्वतः च्या गाडीतून फिरत, तपासणीच्या नावाखाली व्यापाऱ्यांकडून पैशांची उकळपट्टी केल्याचे आरोप होत आहेत. व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष सोहणी व शहराध्यक्ष विनोद पिंगळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहीती दिली. त्यांनी सांगितले की, बीड, केज, धारुर आणि शिरूर ▶▶ उर्वरित पान २ वर

● अन्नभेसळ विभागाचा उद्देश ग्राहक संरक्षणाचा असताना, काही अधिकारी त्याचा गैरवापर करत आहेत. व्यापारात प्रामाणिकपणे काम करणाऱ्याव्यावसायिकांना त्रास दिला जात आहे. आम्ही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी आणि दोषींवर कारवाईची मागणी करणार आहोत.– संतोष सोहन, जिल्हाध्यक्ष, व्यापारी महासंघ

### ● मानसी मॉलमधूनही वसुलीचा आरोप

शहरातील मानसी मॉलचे मालक श्रीकांत घोडके यांनी व्यापारी महासंघाच्या कार्यालयात येऊन आपल्याकडून अन्नसुरक्षा अधिकारी अनुराधा भोसले यांनी तपासणीच्या नावाखाली वीस हजार रुपये घेतल्याची तक्रार केली आहे. त्यांनी सांगितले की, तपासणीच्या नावाखाली माझ्या मॉलमध्ये येऊन त्यांनी सरळ पैसे मागितले आणि देण्यास नकार दिल्यास परवाना रद्द करण्याची धमकी दिली. या प्रकरणाची प्राथमिक माहिती व्यापारी महासंघाने जिल्हाधिकारी यांना देत तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. महासंघाचे पदाधिकारी उद्या जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन लेखी तक्रार सादर करणार आहेत.







## कै.तुकाराम गुरुजी गोधाम मध्ये वसुबारस साजरी

● रस्त्यावरील मोकाट गोमातेच्या रक्षणासाठी सम ाजाने पुढाकार घ्यावा: राजेंद्र मस्के
● प्रत्येक गाईचे रक्षण राष्ट्रधर्म..!



बीड । प्रतिनिधी

गोवत्स द्वादशी वसुबारस निमित्ताने कै.तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्प शिवदरा पालवण येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ.जयश्रीताई मस्के यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने पुजन करून गोम ातेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत वसुबारस सण साजरा केला. दीपावली पर्वाचा प्रारंभ वसुबारस सणापासून सुरू होतो. खऱ्या अर्थाने वसुबारस सण म्हणजे मातृत्व, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेचा हा सण! आधुनिक काळातही हा सण आपल्याला स्मरण करून देतो की, शेती, निसर्ग आणि जनावरांशी आपले नाते हे केवळ उपजीविकेचे नाही, तर संस्कृतीचे आहे. हिंदू धर्मात गाय ही आईच्या दर्जाची पूजनीय तर असुन संस्कृतीचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबांसाठी उपजीविकेचे साधन आहे. ग्रामीण भागात ▶▶ उर्वरित पान २ वर






# प्रकाशाचा विजय : 2025 च्या सावल्यांतून उगवणारी दीपावली



अंधाराचा अंत हाच प्रकाशाचा जन्म असतो – ही ओळ २०२५ च्या जगाला अगदी साजेशी वाटते. युद्ध, नैसर्गिक आपत्ती, आर्थिक चढउतार, आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान लाटेमुळे जग आज एका विचित्र द्वंद्वातून जात आहे. माणूस प्रगतीच्या प्रकाशात पुढे जातोय, पण मनाच्या गाभाऱ्यात थकलेला दिसतो. अशा पार्श्वभूमीवर दीपावली पुन्हा एकदा सांगते – आशेचा दिवा कधीही विझू देऊ नकोस. दीपावली हा फक्त सण नाही, तर भारतीय संस्कृतीचा श्वास आहे. प्रत्येक दिवा म्हणजे उजेडाची प्रार्थना, प्रत्येक रांगोळी म्हणजे आनंदाचे चित्र, आणि प्रत्येक फुलबाजीतून उमटणारी चमक म्हणजे आशेचा ठिणगा. परंपरेने हा सण अंधारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा आणि दुःखावर आनंदाचा विजय साजरा करणारा आहे.

दीपावली पर्व – पाच दिवसांचा प्रकाशोत्सव

भारतामध्ये दीपावली हा एक दिवसाचा नव्हे, तर पाच दिवसांचा प्रकाशोत्सव आहे. या प्रत्येक दिवसाचा एक सुंदर अर्थ आहे.

पहिला दिवस – धनत्रयोदशी : आरोग्य आणि संपत्तीचे प्रतीक, या दिवशी धन्वंतरी देवतेची पूजा होते.

दुसरा दिवस – नरक चतुर्दशी (लहान दिवाळी) : श्रीकृष्णाने असुर नरकासुराचा वध केला, म्हणून हा दिवस वाईटावर चांगुलपणाचा विजय म्हणून साजरा होतो.

तिसरा दिवस – लक्ष्मीपूजन (मुख्य दिवाळी) : या रात्री लक्ष्मीदेवीची आराधना केली जाते. घराघरांत दिव्यांची रांग, सुगंधी फुले, रांगोळ्या आणि गोडधोड पदार्थांची रेलचेल असते.

चौथा दिवस – पाडवा (बलिप्रतिपदा) : राजा बळी आणि विष्णू यांची कथा स्मरून कृतज्ञतेचा सण म्हणून पती–पत्नी एकमेकांप्रती स्नेह व्यक्त करतात.

पाचवा दिवस – भाऊबीज : भाऊ–बहिणींच्या प्रेमाचा उत्सव. बहिण भावाला आरती करून दीर्घायुष्याची प्रार्थना करते.



ही परंपरा केवळ धार्मिक नाही, तर भारतीय कुटुंब व्यवस्थेतील आपुलकी आणि ऐक्य यांचे प्रतीक आहे.

२०२५ हे वर्ष विरोधाभासांनी भरलेले ठरले. युरोपमध्ये युद्धाचे सावट, मध्यपूर्वेतील संघर्ष, आणि आफ्रिकेतील दुष्काळ – या सर्वांनी मानवतेच्या मुळावर घाव घातला. तुर्कीतील भूकंपाने हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली, तर हवामान बदलामुळे जगभरात नैसर्गिक आपत्तींची मालिका सुरू राहिली. परंतु या अंधारातही काही उजेडाचे किरण होते – कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती, आरोग्य क्षेत्रातील नवे संशोधन, आणि अवकाशात झेप घेणारा भारत. चांद्रयान – ३ च्या यशानंतर आता मंगळयान – २ ची तयारी सुरू आहे. ‘मेड इन इंडिया’च्या बळावर भारताने आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय लिहिला आहे. आजची दीपावली परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवते. शहरांत स्मार्ट दिवे, इको–फ्रेंडली रांगोळ्या आणि डिजिटल शुभेच्छा, तर गावांत मातीच्या दिव्यांचा मंद उजेड आणि श्रद्धेचा सुगंध. लक्ष्मीपूजनाच्या रात्री घराघरांत दिव्यांची माळ झळकते, पण खरा प्रकाश माणसाच्या अंतःकरणात झिरपतो. दिवा जळतो तो दुसऱ्यांसाठी ही म्हण आजही तितकीच खरी आहे. पाडव्याच्या दिवशी पती–पत्नीतील स्नेहाचे बंध दृढ होतात, तर भाऊबीजेच्या ओवाळ्यात भाव–बहिणींचे नाते उजळते.

जगभरातही दीपावलीचा प्रकाश पसरला आहे. लंडन, न्यूयॉर्क, सिंगापूर, मॉरिशस, आणि कॅनडा येथे ‘फेस्टिवल ऑफ लाइट्स’ म्हणून भारतीय संस्कृतीचा हा उत्सव साजरा होतो. २०२५ मध्ये लंडनच्या ट्रॅफल्गार स्क्वेअरवर सस्टेनेबल दिवाळी या संकल्पनेखाली प्लास्टिकविरहित सजावट आणि एकत्रित प्रार्थना करण्यात आली. तमसो मा ज्योतिर्गमय या मंत्राचा अर्थ जग आता अनुभवत आहे. फटाक्यांच्या धुरात हरवणाऱ्या आकाशाने आपल्याला विचार करायला लावले आहे. त्यामुळे हरित दिवाळीचा संकल्प अधिक बळावतोय. दिवे लाव, पण मनही उजळव – हा संदेश आजची तरुण पिढी सोशल मीडियावर ट्रेंड बनवतेय. रांगोळ्यांच्या रंगांबरोबर विचारांचे रंगही उमटत आहेत. या वर्षी अनेक दुःखद घटना घडल्या असल्या तरी, मदतीचा हात पुढे करणारे लोकच या जगाचा खरा प्रकाश आहेत. भारतीय स्वयंसेवी संस्था, डॉक्टर्स आणि युवकांनी आपत्तीग्रस्त भागात जाऊन मदतीचा दिवा पेटवला. दीप तोच खरा, जो दुसऱ्याच्या अंधारात उजेड करतो – या वाक्यात या वर्षीची दिवाळी जिवंत आहे. २०२५ च्या या दीपावलीत भारत नव्या आत्मविश्वासाने उजळला आहे. विज्ञानात पुढे, संस्कृतीत ठाम, आणि मानवतेत तेजस्वी – हीच खरी प्रगती. अंधार कितीही गडद असो, एका छोट्याशा दिव्याने तो हरवता येतो.

दीप जळत राहो,
मन उजळत राहो, आणि
माणुसकीचा प्रकाश कधीच
विझू नये – हीच प्रार्थना,
हीच खरी दीपावली.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

# गुरुकुल इंग्लिश स्कूलचे नेट बॉल , बॅडमिंटन,जलतरण च्या शालेय जिल्हास्तरी स्पर्धेमध्ये सुयश

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय स्पर्धेमधील गुरुकुल इंग्लिश स्कूलचे खेळाडूंनी सहभाग घेतला होता त्यामध्ये नेट बॉल ,जलतरण ,तायक्कांदो, बॅडमिंटन या खेळामध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी प्रथम पारितोषिक पटकावले. नेटबॉल संघामधील विजयी खेळाडू वेदांत थिटे, अर्णव कुलकर्णी, शुभांग मुंदडा, सिद्धांत निर्मळ, स्वराज जाधव, पृथ्वीराज राठोड, राजवीर राख, पृथ्वीराज सोंडगे, समर्थ इंगळे, रणवीर राठोड , यश नेरकर या खेळाडूंनी जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले. १४ वर्षाखालील मुलीचे संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले संघा मधील विजय खेळाडू गौरवी परळकर, श्रावणी पटील, सेजल सोळुंके, प्रिया राणी बेदरे , स्वराली जायभाय, आलिशा , सई शिंदे, श्रावणी टिपाले , श्रावणी न, रुची कांबळे वरील प्रथम आलेले खेळाडू परभणी येथे येणाऱ्या शालेय विभागीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. जिल्हास्तरीय तायकोंडो मधील विजयी खेळाडू यशस्वी चव्हाण, तन्वी जायभाय जलतरण जिल्हास्तरीय मधील विजय खेळाडू अथर्व राठोड, समर्थ जाधव, अभया गर्जे, बॅडमिंटन १४ वर्षाखालील मुली सिद्धी सानप, सई तुपे, गार्गीदास खेडकर, १७ वर्षाखालील मुली सृष्टी बागलाने धनश्री खांडे, आनंदी बिडवे, गौरवी तुपे राजनंदिनी दुबाले,नवरील खेळाडूंना कल्याण माने , रामदास गिरी यांचे मार्गदर्शन लाभले . या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉक्टर राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे, प्राचार्य शितल सर्वज्ञ ,उपप्राचार्य सारा मॅडम , गणेश इंगोले, निशांत घुगे, क्रीडा प्रशिक्षक रामदास गिरी, कल्याण माने, महेश गव्हाणे रुक्मिणी ढोबळे अन्य प्रशिक्षक व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



◆ पान १ वरून पुढे...

## ओबीसी डीएनए...

होणारा अन्याय अत्याचार बंद करावा, असे भुजबळ म्हणाले, भाजपचा डीएनए ओबीसी असे सांगणाऱ्यांनी हा 'जीआर' काढला आणि ओबीसींशी दगाफटका केला, असा आरोपही त्यांनी फडणवीस यांचे नाव न घेता केला. मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही. मात्र सरकारने त्यांना त्यांचे वेगळे आरक्षण द्यावे. ओबीसी आरक्षणात घुसखोरी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. मराठा आंदोलकांचा विखे पाटलांना घेराव– छत्रपती संभाजीनगर 'मराठा समाजाता कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात राज्य सरकारने २ सप्टेंबरला हेदराबाद गॅझेट लागू केले. या जीआरमधून काय मिळाले ? तो फसवा आहे का ? असा प्रश्न पैठण तालुक्यातील मराठा आंदोलकांनी मराठा आरक्षण उपसमितीचे राधाकृष्ण विखे पाटील यांना शुक्रवारी (ता. १७) एका हॉटेलमध्ये घेराव घालत विचारला. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या बैठकीसाठी विद्ये शहरात आले होते. कार्यकर्त्यांनी विखे यांना धारेवर धरत विचारले, 'जीआर जारी होऊन दीड महिना झाला. पण, अद्याप एकही कुणबी प्रमाणपत्र का निघाले नाही, आजवर राज्यभरातील एकाही गावात जीआरनुसार ग्रामस्तरीय समितीची स्थापना का झाली नाही ? त्यावर विखे यांनी उत्तर देतानाही ग्रामस्तरीय समिती स्थापन झाली नसल्याचे मान्य केले.

## जिल्हा जातपडताळणी....

मग दररोज येणारे हजारो प्रस्ताव, त्यासाठी लागणारा कालावधी, व त्यात पुन्हा नवीन शैक्षणिक वर्ष यामुळे कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर ही कामाचा खुप भार असतो. त्यात पुन्हा विहित नियम, निकषांमध्ये सदरील प्रस्तावात काही त्रुटी आल्यास तो प्रस्ताव त्रुटी पूर्ततेसाठी सादर केला जातो व लाभार्थ्यांना विहित वेळेत त्रुटी पूर्तता करुन प्रस्ताव सादर करण्यासाठी सांगितले जाते. पण, अनेकदा विहित वेळेत लाभार्थी त्रुटी पुर्तता करत नाहीत व प्रस्ताव तांत्रिक त्रुटींमुळे अडकला जातो. सदरील अडचोव दुर होऊन सर्व लाभार्थी नागरिक व कार्यालयीन कर्मचारी, प्रशासनात सुसंवाद निर्माण होऊन विहित वेळेत त्रुटींची पुर्तता होऊन प्रस्ताव मंजुर व्हावेत व सर्व सामान्य नागरिकांना त्याचा लाभ व्हावा, या उदात्त कर्तव्य सेवाभावनेतुन बीड जिल्हा जातपडताळणी समितीने माहे जानेवारी २०२५ ते माहे सप्टेंबर २०२५ दरम्यान स्वत: पुढाकार घेत विविध शिबिर, अभियान या माध्यमातून नागरिकांकडुन जागेवर त्रुटी पुर्तता करुन घेत तात्काळ जात पडताळणी प्रमाणपत्राचे वाटप केले. त्यामुळे विविध स्तरांतुन बीड जिल्हा जात पडताळणी समितीच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाला भरघोस प्रतिसाद मिळत असुन समितीचे प्रशासन व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे. नागरिकांच्या प्रतिसाद व मागणीमुळे हा उपक्रम असाच यापुढे ही चालु ठेवत ज्या गरजुंचे प्रस्ताव त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, अशांनी कार्यालयीन वेळेत येऊन आपल्या त्रुटी पुर्तता करुन आपले जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवावे व उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे नम्र आवाहन बीड जिल्हा जात पडताळणी समितीने केले आहे.

## 'स्वाराती' संस्थेकरीता...

◆ पान १ वरून पुढे...

नियंत्रित करणे, गोळा करणे व स्विकारणे व राज्य शासनास रुग्णालयांसाठी अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही अशा विशेष बाबींसाठी त्या उपयोगात आणणे, कोणती देणगी स्विकारण्यामध्ये अथवा तिचा रुग्णालयासाठी उपयोग करताना अंमलात असलेल्या नियमांचा व आदेशांचा भंग होता कामा नये. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समितीच्या काम काजामध्ये आवश्यक त्या पध्दती विहीत करणे व इतर आवश्यक त्या गोष्टी करणे. आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अमंलबजावणीचा आढावा घेणे आदि विषयांसाठी अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आलेले असून खा.बजरंग सोनवणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

दोन महिन्याला खा.सोनवणे घेतील बैठक

१) समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा तरी बोलविण्यात येणार आहे. अध्यक्षांनी निर्देशित केल्यास, अधिक वेळा बैठक बोलविता येईल. २) कोणीही सदस्य सतत दोन बैठकीत अनुपस्थित राहिल्यास त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल, परंतु सदस्य योग्य व सबळ कारणांसाठी अनुपस्थित राहिला असल्यास सभासदत्व पुढे चालू ठेवण्यास शासन अनुमती देईल. ३) समितीच्या प्रत्येका बैठकीची आगाऊ सूचना बैठकीच्या दिनांकापासून १० दिवस अगोदर बैठकीच्या कार्यसूचीसह समिती सदस्यांना पाठविण्यात येईल. ४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्याचा हक्क राहील व त्या उपस्थितीच्यावेळी त्यांना समितीच्या सदस्यांचे हक्क व दर्जा प्राप्त असेल. ५) समितीच्या बैठकीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुबई यांना समितीच्या सदस्य सचिवांनी बैठकीच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत पाठवावा.

## बीडचा नगराध्यक्ष...

बीडच्या माजी दबंग खासदार डॉ. प्रितमताई साहेब मुंडे या साथ देत आहेत. त्यांनी मोठ्या ताकतीने भारतीय जनता पार्टीला बीड जिल्ह्यात बळकटी दिली आणि प्रत्येक गावात निष्ठावंत कार्यकर्त्यांची फौज तयार केली . बीड शहर हे जिल्ह्यातील मुख्य आणि महत्त्वाचे ठिकाण असून या ठिकाणीही भारतीय जनता पार्टीची मोठी ताकद आहे याचा प्रत्यय वेळोवेळी झालेल्या लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद व नगर परिषदेच्या निवडणुकीत बीडकरांना आलेला आहे. बीड शहर भाजपात निष्ठावंत व सक्रिय कार्यकर्त्यांची फळी आहे. सदय परिस्थितीचा विचार केला तर महायुतीतील प्रत्येक घटकपक्षांनी स्थानिक स्तरावर मित्र पक्षांच्या समन्वयाने जिथे ज्याची ताकत जास्त त्यांनी तिथे स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा वरिष्ठ पातळीवर निर्णय झालेला आहे. बीड मधील इच्छुक उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता ही निवडणूक भारतीय जनता पार्टी स्वबळावर ताकदीने लढवणार असून बीडचा नगराध्यक्ष हा भारतीय जनता पार्टीचाच होणार असा दृढ विश्वास भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आणि न. प. निवडणूक पक्ष निरीक्षक अक्षय भैया मुंदडा यांनी व्यक्त केला ते बीड नगर परिषद २०२५ च्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती करिता निरीक्षक म्हणून बीड येथील हॉटेल अन्विता येथे झालेल्या बैठकीस उपस्थित होते. सदरील बैठकीचे आयोजन बीड भाजपाचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या पुढाकारातून

◆ पान १ वरून पुढे...

करण्यात आले होते. या बैठकीस निरीक्षक म्हणून वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेश दादा कराड, भाजपाचे राज्य परिषदेचे सदस्य अरुण आबा राऊत, माजलगाव मंडलाच्या अध्यक्षा रूपालीताई कचरे, यांच्या सह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, शिवाजी आप्पा मुंडे, अजय सवाई, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, अल्पसंख्यांक मोर्चाचे सलीम भाई जहांगीर, अनुसूचित जाती मोर्चेचे अनिल चांदणे, जेष्ठ नेते पालसिंगणकर काका यांच्यासह मोठ्या संख्येने शहरातील भाजपा पदाधिकारी, इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी शहरातील पदाधिकाऱ्यांनी ताकदीने कामाला लागावे व मतदार यादीचे निरीक्षण करून आपापल्या प्रभागात फिरून जास्तीत जास्त मतदारांशी संपर्क करावा. पक्षाची भूमिका आणि बीड शहराचा विकास करण्यासंदर्भात आपण कटिबद्ध आहोत असा विश्वास नागरिकात निर्माण करत भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यास आम्ही सर्वप्रथम शहरात स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याकरता कटिबद्ध राहूत असा विश्वास मतदारांच्या मनात बिंबवावा. वार्डातील प्रतिष्ठित व्यक्ती, विविध क्षेत्रातील मान्यवर, समाज सेवक यांच्या भेटी व बैठका घ्याव्यात तसेच बूथची रचना करावी, असे आवाहन उपस्थिताना केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नवनाथ अण्णा शिराळे यांनी केले.

## कारवाया गुलदस्त्यात...

या ठिकाणी अन्नभेसळ विभागातील काही अधिकारी व्यापाऱ्यांकडून परवाने व नूतनीकरणाच्या नावाखाली वसूली करत आहेत.

## कै.तुकाराम गुरुजी...

वसुबारस सादर करण्याची पुरातन पद्धत आहे. आनंदाने आणि प्रेमाने साजरा करतात. ग्रामीण अर्थकारणात – गोवंशाचे योगदान आजही अतुलनीय आहे. परंतु गोमातेचीवसुबारसच सणाच्या एका दिवसा पुरती पूजा आरती नको तर वर्षभर गोमातेच्या रक्षणाचा संकल्प करावा लागेल. आज गोमाता व गोवंशाची परिस्थिती लक्षात घेता ती जिवंत राहिली, तरच शेतकऱ्यांची शेती, दुधाचा जोडधंदा आणि संस्कृती टिकून राहील. प्रत्येक गायीचे रक्षण हा राष्ट्रधर्म ठरला पाहिजे. गोमातेचा सन्मान कृतीतून दिसला पाहिजे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वसुबारस गोमाता पुजन निमित्ताने केले आहे. जिथे गोमातेचा सन्मान येथे समृद्धी नांदते यावर हिंदू धर्मीयांचा अतूट विश्वास असल्यानेआनंदी जीवनासाठी अंगणात गाय बांधून संगोपन केले जाते. सर्वत्र गोहत्या बंदीचा जागर केला जातो. तर दुसरीकडे रोज स्त्यावर मोकाटपणे भटकणाऱ्या गायींच्या हालअपेष्टा मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.रस्त्यावर उपाशीपोटी गायी फिरतात. प्लास्टिक खातात त्यातून त्यांच्या आरोग्याला बाधा होते. प्रसंगी मोकाट जनावरांना प्राणही गमवावे लागतात. वाहतुकीला अडथळा निर्माण करतात त्यातून अपघात घडतात, अनेकदा गायी पण जखमी होतात. अपंगत्व प्राप्त होते. ही लाजिरवाणी व वेदनादायी वस्तुस्थिती आहे. मोकाट जनावराच्या संगोपनासाठी आपण

◆ पान १ वरून पुढे...

बीड नगर परिषद प्रशासनाकडे प्रस्ताव दिला होता परंतु त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. गोमातेच्या सन्मानासाठी गोहत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या प्रत्येक गाईंच्या रक्षणासाठी समाजाने संवेदनशील मनाने पुढाकार घ्यावा ही आग्रहाची विनंती.

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यस्तरीय व....

युवा महोत्सव सांस्कृतीक नवोक्रम व विकसीत भारत– जिल्हास्तर व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रम विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रमासाठी जिल्हा व विभागस्तरीय युवा महोत्सव जिल्हा व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली विकसित भारत २०४७ या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक नवोपक्रम बैठकीत युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, युवक–युवतींची निवड प्रक्रिया, पारंपरिक व आधुनिक कलांच्या सादरीकरणाची रूपरेषा, प्रचार व प्रसाराचे माध्यम, तसेच आयोजनासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्वतयारी यावरही चर्चा करण्यात आली. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील कलागुणांना चालना मिळेल. सेच, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने नियोजन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या महोत्सवातून केवळ सांस्कृतिक उन्नतीच नव्हे, तर सामाजिक एकात्मता, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता अशा अनेक विषयांचा समावेश असणार आहे. शेवटी सर्व उपस्थितांनी उत्साहपूर्वक सहभाग देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. बैठकीपूर्व जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रस्ताविक केले.

## चौसाळा येथे...

लोढा यांच्या हस्ते व मातेचे पूजन करून वसुबारस हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी माझी जिल्हा परिषद सदस्य भीमराव विधाते, प्रा. श्रीधर ठास, युवा नेते संतोष नाईकवाडे पत्रकार संघाचे मार्गदर्शक बळीराम राऊत, पत्रकार प्रसाद देशमुख तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ईट येथील...

साळवे साहेब,श्री जाधवर साहेब, श्री विस्तार अधिकारी सय्यद साहेब,श्री टी.ओ. साळी साहेब,श्री सुहास जोगदंड, एस. डी. ओ. श्री गर्जे साहेब श्री सारुक साहेब कृषी सहायक अधिकारी घोडके, श्री झळक साहेब श्री राऊत कृषी सहायक अधीकारी व गटातील शेतकरी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## पुढील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे जलनायक मयंक गांधी यांना आश्वासन



**परळी वै. । प्रतिनिधी**

ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अडचणी यांची सविस्तर चर्चा केली. मागील भेटीच्या वेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ट्रस्टकडून करण्यात आली होती. या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना येत्या एक ते दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार असल्याचे आश्वासन दिले.

तसेच अतिवृष्टीमुळे खरवडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे करून संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे काम येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी जलनायक मयंक गांधी प्रयत्नशील आहेत.

# संकटाच्या काळात शिवछत्र परिवार कायम जनतेच्या पाठिशी: रणवीर पंडित

### शारदा प्रतिष्ठानच्यावतीने पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्ती येते तेंव्हा गेवराई विधानसभा मतदार संघातील प्रत्येक नागरीकाच्या पाठिशी शारदा प्रतिष्ठान आणि शिवछत्र परिवार खंबीरपणे उभा राहत आला आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि गोदावरी व सिंदफणा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरीकांचे प्रचंड नुकसान झाले अशावेळी शिवछत्र परिवाराने सर्वांना धिर दिला. सिंदफणा नदीला आलेल्या पुरामुळे हिंगणी हवेली व परिसरातील नागरीकांचे प्रचंड हाल झाले. या भागातील विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्याचही मोठे नुकसान झाले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा



देणे आणि संकटाच्या काळातही त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहणे हा शारदा प्रतिष्ठानचा हेतू आहे असे प्रतिपादन शारदा स्पोर्टस् ॲकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. हिंगणी हवेली येथे शालेय विद्यार्थ्यांना शारदा प्रतिष्ठानच्यावतीने शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदार संघातील सिंदफणा नदीला आलेल्या महापूरामुळे या नदीकाठच्या गावांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. हिंगणी हवेली येथे शारदा प्रतिष्ठानच्यावतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्टस् ॲकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच शाहेद पटेल, अशोक ढास, शेख सद्दाम, पठाण रिजवान, शेख सादेक, शिवनाथ बुधनर, अंगद बुधनर, संभाजी वडमारे, कैलास निर्मळ, वाहेद बेग, अजय घोडके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रणवीर पंडित पुढे म्हणाले की, कठिण परिस्थितीमध्ये आपण एकमेकांना सहकार्य केले पाहिजे. शिवछत्र परिवार संकटाच्या काळात नेहम ीच गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरीकांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहिला. पूर परिस्थितीमध्ये निवारा उभारून पूरग्रस्तांना आधार दिला, विद्यार्थ्यांच्या शालेय साहित्याचेही या पूर परिस्थितीमध्ये प्रचंड नुकसान झाले. मुलांचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीमध्ये थांबता कामा नये. शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांना प्रेरणा देण्याचे काम यानिमित्ताने होत आहे. गोदावरी नदी काठावरील गावाच्या विद्यार्थ्यांनाही शालेय साहित्य वाटप केले जाईल असेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नांदुर हवेलीचे सरपंच शाहेद पटेल यांनी केले. यावेळी कु.सोनल बुधनर या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले, उपस्थितांचे आभार बिभिषण कदम यांनी मानले. यावेळी हिंगणी हवेली आणि परिसरातील नागरीक मोठ्या

# कौतुकास्पद उपक्रम : दिवाळीनिमित्त किराणा किट व कपडयांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून दिवाळी निमित्त स्व. काकू नानांचा वारसा पुढे चालवण्यासाठी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्याचाच एक भाग म्हणून दि. १६ ऑक्टोंबर २०२५ रोजी सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या सोशल सायन्स फोरम युनिट व कर्मचारी कल्याण समितीच्या वतीने आदिवासी समीकरण अनाथ सेवा प्रकल्प वासनवाडी रामगड, तसेच स्नेहसावली प्रकल्प रामनगर आणि आनंदग्राम इन्फंट इंडिया बीड या ठिकाणी आदीवासी, अनाथ,



एचआयव्ही बाधित मुलांची दिवाळी गोड होण्यासाठी आणि सामाजिक बांधीलकी जपण्यासठी किराणा किटचे वाटप व आर्थिक मदत करण्यात आली. सौ. के. एस.के. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, डॉ. अनिता शिंदे व सोशल सायन्स फोरम युनिटचे चेअरमन डॉ. राहुल सोनवणे,डॉ. व्ही.एम. चौधरी, डॉ. दुष्यंता रामटेके, डॉ. डी.ई. नेटके यांच्या उपस्थितीत किराणा किटचे व कपडयांचे वाटप करण्यात आले. याकार्यक्रमानिमित्त मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे म्हणाल्या की, समाजातील अनाथ, गरीब कुटूंबातील मुले हे सण साजरे करण्यापासून वंचित राहु नयेत म्हणून त्यांची दिवाळी गोड व्हावी या उदात्त हेतूने समाजातील इतर सामाजिक संस्थानी पुढाकार घेवून मदतीचे हात पुढे केले पाहिजे. तसेच डॉ. राहुल सोनवणे म्हणाले की, सोशल सायन्स फोरम युनिटचे उद्देश समोर ठेवून आम्ही कार्य करत आहोत. जेणे करुन समाजातील वंचित घटकातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने आणि संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मनके व सांधे बदली, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी अशा अस्थिरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागड्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता अत्यल्प दरात उच्च दर्जाची सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे. या शिबिरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण अवघ्या ₹६५,००० मध्ये गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध असणार आहे. तसेच, 'महा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे. याशिवाय, जे रुग्ण या योजनेसाठी पात्र नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CM Relief Fund) अंतर्गत उपचार मिळवून देण्यात येणार आहेत. प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त ₹१०० असून, इच्छुकांनी मो. ८२६२००९०९१ या क्रमांकावर संपर्क साधावा. वेळेअभावी नोंदणी न करता आलेल्या रुग्णांचीही तपासणी करण्यात येणार आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज १२९८ / २०२५

तुषार पि. रावसाहेब गुजर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. व्दारकाबाई लिंबाजी उबाळे, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. नाथापुर, ता.जि. बीड, २. संदिप पि. लिंबाजी उबाळे, वय-२७, वर्षे, धंदा-शेती. रा. सदर. ३. दिपक पि. लिंबाजी उबाळे, वय-२५ वर्षे, धंदा-शेती. रा. सदर.

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यानी या न्यायालयात मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे याच वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचा मृत्यु दिनांक ०८.०७.२०१५ रोजी नाधापुर ता. जि. बीड झाला असुन अर्जदार के ०१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे मूले आहेत हे मयताचे कायदेशीर वारस आहे

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याने आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत को. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर मदरहु कोर्ट मदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६ सप्टेंबर २०२५

(मार्फत- ॲड. वाय आर शेळके)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज १५६९ / २०२५

द्वारका विरुध्द निरंक

अर्जदार- १. द्वारका भ्र. हनुमान मस्के, वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम, २. हनुमान पि. किसन मस्के, वय - ६५ वर्षे, धंदा- शेती, दोघे रा. पालवण ता. जि. बीड

विरुद निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचा मृत्यु दिनांक १९/०५/२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ व २ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क. १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क. १ व २ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६/११/२०२५ आहे.

(मार्फत- ॲड.एस.एस.महाजन)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**

e-mail -tahsildar georai2@gmail.com

दिनांक १४.१०.२०२५

दुरध्वनी क्र. ०२४४७-२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि-

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई

२. ग्राम महसूल अधीकारी गेवराई

विषय: जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८१)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार जिजाबाई पुन्ना राठोड, रा. पाचेगाव / जयराम तांडा ता गेवराई जि बीड यांचा जन्म दिनांक २८/ ०७/१९७३

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०१ अर्जदार जिजाबाई पुन्ना राठोड रा. पाचेगाव / जयराम तांडा ता गेवराई जि बीड यांचा जन्म दिनांक २८/ ०७/१९७३ रोजी पाचेगाव ता गेवराई जि बीड येथे झालेला आहे तरी याबाबत कोणाला आक्षेप असेल तर पंधरा दिवसाच्या या आत कळवा.

संदर्भ क्र ०१ चे शासन निर्णय दिनांक १२.०३.२०२५ मध्ये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२६/ ईऑ९ ९१ १८१)/प्र.क्र. २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टें गेवराई/ पाचेगाव / जयराम तांडा यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी राहेरी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का (स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, गेवराई

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १४३३/ २०२५

गणेश वि. निरंक

ज्याअर्थी- राजाभाऊ गणपती तोडेकर, हे दिनांक ०३.०७.२०२५ रोजी मौजे च-हाटा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी

१. गणेश पि. राजाभाउ तोडेकर, वय ४० वर्षे, धंदा- शेती, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, २. रमेश पि. राजाभाउ तोडेकर, वय-३६ वर्षे, धंदा- शेती, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, ३. सुरेश पि. राजाभाऊ तोडेकर, वय ३५ वर्षे, धंदा नौकरी, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि. बीड, ४. विजयकला पि. राजाभाऊ तोडेकर, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मेंगडेवाडी, बीड ता. जि.बीड, ५. पंचफुला भ्र. विक्रम घाडगे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकनाथपूर, बीड ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले आहे. तसेच अर्जदार क्र. ४ या मयताच्या पत्नी असून अर्जदार क्र. ५ ही विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदाराला सदरहु मयत यांचे वारस असल्याबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २७.१०.२०२५ ही आहे.

आज दिनांक १४.१०. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(ॲड. उबाळे एस.एस. यांचे मार्फत)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज १४८१ / २०२५

कृष्णा पि. यादवराव वडमारे व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. कृष्णा पि. यादवराव वडमारे, वय ५६, वर्षे, धंदा- मजुरी, रा.कागदीवेस, बीड ता जि. बीड, २. बाळासाहेब पि. यादवराव वडमारे, वय-४३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. वरीलप्रमाणे., ३. लता भ्र. चंद्रकांत जाधव, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. बौध्द मंदिर सिध्दार्थ नगर, अंबरनाथ पश्चिम जवळ, तहसिल ऑफीसच्या मागे, अंबरनाथ जि. ठाणे. (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भिमराव पि. पिराजी वडमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे..

ज्याअर्थी भिमराव पि. पिराजी वडमारे यांचा मृत्यु दिनांक ११.०६.२००० रोजी कागदीवेस बीड ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ वर हे मयतांचे पुतणे असुन अर्जदार के ३ ही मयताची पुतणी आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते. की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मदरहु मयत भिमराव पि. पिराजी वडमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११ नोव्हेंबर २०२५ दिले.

(मार्फत- ॲड. टि.बी. भालेराव)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती एस.डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४८५/२०२५

छाया बागडे व निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार:१. छाया भ्र. विष्णु बागडे, वय: ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. गारखेड परिसर, छ. संभाजीनगर ह.मु. जुना बाजार, बीड ता जि.बीड, २. वैभव पि. विष्णु बागडे, वय २८ वर्षे, धंदा - व्यापार, रा. सदर, ३. शुभम पि. विष्णु बागडे, वय २६ वर्षे, धंदा-व्यापार, रा. सदर, ४. ज्ञानेश्वर पि. विष्णु बागडे, वय २५ वर्षे, धंदा-व्यापार, रा. सदर, ५. आसराबाई भ्र. कांता बागडे, वय: ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. लोणी ता. शिरुर कासार जि. बीड ह.मु. जुना बाजार, बीड ता. जि.बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे विष्णु पि. कांताराव बागडे राहणार - रा. जुना बाजार बीड, ता.जि.बीड हे दिनांक ०९.०४. २०२५ रोजी जुना बाजार बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे विष्णु पि. कांताराव बागडे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्या अर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत विष्णु पि. कांताराव बागडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/१०/२०२५ आहे.

आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

( विधीज्ञ ॲड संजोत महाजन)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. वसंत एस. यादव साहेब, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १५१७/२०२५

जिजाबाई व इतर वि- निरंक

ज्याअर्थी मयत नामे बाळु महादेव बहिरवाळ रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड हे दि. १९०७.२०२५ रोजी मौजे विवेकानंद हॉस्पीटल बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- (१) जिजाबाई महादेव बहिरवाळ वय ७९ वर्षे धंदा घरकाम रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड (२) लहानाबाई बाळु बहिरवाळ वय ४२ वर्षे धंदा- घरकाम रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड. ३) शुभम बाळु बहिरवाळ वय २६ वर्षे धंदा- शेती रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड ४) सुरेखा बाळु बहिरवाळ वय २५ वर्षे धंदा घरकाम रा. मंझरी (हवेली) ता.जि.बीड (५) सागर बाळु बहिरवाळ वय २१ वर्षे धंदा- शिक्षण रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाळु महादेव बहिरवाळ रा. मंझरी (हवेली) ता. जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज ०६/१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : १७.११.२०२५

( मार्फत ॲड. एम.डी. धांडे बीड)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ८४२ / २०२५

मंगल शिवाजी जाधव - विरूध्द- निरंक

ज्याअर्थी मयत नामे शिवाजी संदीपान जाधव हे दिनांक १४.०८.२०२५ रोजी गढी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार- १. श्रीमती मंगल शिवाजी जाधव, वय ४० वर्षे धंदा - घरकाम रा. गढी ता. गेवराई जि. बीड, २. संकेत शिवाजी जाधव , वय २३ वर्षे धंदा - मजुरी, रा. सदर ३. प्रतिक्षा शिवाजी जाधव, वय २६ वर्षे धंदा - घरकाम, रा. सदर

गैरअर्जदार - १. निरंक

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे शिवाजी संदीपान जाधव, गढी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २०.११.२०२५

(मार्फत ॲड. जोशी आर ए )

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३७/२०२५

कान्हु पि. उत्तम करचुंडे व इतर

याअर्थी मयत दगडाबाई भ्र. उत्तम करचुंडे, रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक ०८/०१/२०२० रोजी मौजे नानगाव (गणेश रोड), ता. दौंड जि. पुणे येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ कान्हु पि. उत्तम करचुंडे वय ३३ वर्षे, धंदा शेती रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड ह. मु. भारत नगर-२, कुली कॅम्प उल्हासनगर, ४ ता. शेती, रा. राजापुर जि. ठाणे अर्जदार क. २ उत्तम पि. दगडु करचुंडे, वय ६७ वर्षे, धंदा ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत दगडाबाई भ्र. उत्तम करचुंडे, रा. राजापुर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक /१०/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २४/११/२०२५

( मार्फत ॲड. पी. एम. पटेकर, गेवराई)

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५ 

## बाजारात सोयाबीनला कवडीमोल भाव, व्यापारी शेतकऱ्यांना लुटू लागले
## शासकीय हमीभाव खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा: उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**



बीड: (प्रतिनिधी )जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. हाताशी आलेले पीक जम िनदोस्त होताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. ह्या अस्मानी संकटातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत असतानाच बाजारात सोयाबीनची कवडीमोल भावात खरेदी करून शेतकऱ्यांना संकटात ढकलण्याचे पाप होत आहे. शेतकऱ्यांची लूट थांबविण्याकरता तात्काळ शासकीय खरेदी केंद्र सुरू करावीत, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे. दिवाळीचा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला असताना शेतकऱ्यांनी अतिवृष्टीत वाचवलेले सोयाबीन काढून बाजारात आणले आहे. सोयाबीन काढण्यासाठीही मोठा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. सोयाबीन म जुरीचे दर ६०० ते ७०० रुपये झाले आहेत. मजूर मिळत नसल्याने हेक्टरी गुत्ते पद्धतीने काढण्यासाठी दयावे लागत आहे, त्यात दीडपटीने खर्च जास्त येत आहे. आपली आर्थिक गरज भागवण्यासाठी बाजारात विक्री शिवाय पर्याय राहिला नाही. शासनही या लुटीच्या पाठीशी असल्याचे वाटत असून आजपर्यंत शासकीय दराचे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू झालेले नाहीत. शेतकऱ्याच्या सोयाबीनला सध्या बाजारात ३५०० ते ३८०० रुपयांचा भाव मिळत असून शासकीय दर ५३३८ रुपये आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. महायुती सरकारने तात्काळ शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे, अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे.

## कपिलधारवाडीतील सर्पदर्शमुळे गायीचा मृत्यू; गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते. शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्याम ुळे या गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या म दतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

### • शेतकऱ्यास नुकसानभरपाईची मागणी

**ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.**

# राज्यस्तरीय व विभागस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांसाठी तयारीला वेग

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी नियोजन बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय तसेच विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यंदाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहा पूर्वतयारी बैठक संपन्न झाली.



या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस अधीक्षक प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे अधिकारी, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही स्पर्धा म्हणजे जिल्ह्यातील तरुणाईसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. खेळाडूंना योग्य सुविधा, निवास, भोजन व वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होणं आवश्यक आहे. त्यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून स्पर्धेच्या तयारीत कोणतीही कमतरता राहू न देण्याचे

**महत्त्वाचे निर्णय: सर्व खेळांच्या मैदानांची साफसफाई व आवश्यक दुरुस्ती तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करावी, तसेच प्रत्येक मैदानावर प्राथमिक उपचार किट उपलब्ध ठेवण्यात यावे.पोलीस विभागाने वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. स्थानिक विद्यालये व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात यावी.**

निर्देश दिले.तसेच क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट आलेल्या खेळाडूंना उत्तम प्रकारची ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साहा वाढावा यादृष्टीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा. या स्पधेत १७ वर्षे मुले व मुली. सहभागी होऊ शकतील. या स्पर्धा दि. २९ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान बीड येथे छत्रपती संभाजी मैदान येथे व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्यात येणार आहेत. जिल्हाभरातून आणि विभागातील विविध तालुक्यांतून खेळाडू सहभाग घेणार आहेत.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून ही स्पर्धा एक आदर्श आयोजन ठरेल, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

## चौसाळा येथे महावीर गोरक्षण संस्थांनमध्ये वसुबारसेचा कार्यक्रम उत्साहात साजरा

**चौसाळा । प्रतिनिधी**

वसुबारस पासून दीपावली सणास मोठ्या उत्साहात सुरुवात होते बीड जिल्ह्यातील चौसाळा या ठिकाणी परमपूज्य आदरणीय गणेश लालजी महाराज साब यांनी ७० वर्षांपूर्वी महावीर गोरक्षण संस्थांची सुरुवात करून गोपालनाचे कार्य सुरू केले आज त्याचा वटवृक्ष झाला असून माजी आमदार कै. चांदमलजी लोढा यांनी दोन एकर जमीन दान देऊन



गोरक्षणासाठी गोठ्याची जागा उपलब्ध करून दिली आज यामध्ये ५५० देशी गाईंचे पालन पोषण केले जाते अशोक लोढा यांच्या अध्यक्षतेखाली हे कार्य अविरतपणे चालू आहे आज या ठिकाणी बंकट स्वामी मठाचे मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प. नाना महाराज कदम, भीमाशंकर शुगर मिल्स चे कार्यकारी संचालक नितीन लोढा, जिल्हा परिषद सदस्य अशोक ▶ उर्वरित पान २ वर




*बीड: दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! बीड जिल्हा व सत्र न्यायालयात बीड जिल्हा वकील संघातर्फे सर्व माननीय न्यायाधीश व वकील बंधू-भगिनींसाठी फळ व अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.*

## आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

आरोग्य कर्मचारी म हासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी म हासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर



जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## ईट येथील शेतकऱ्यांना साळवे यांनी केले शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर हुन कृषी सह संचालक जिल्हा कृषी अधीक्षक श्री सुभाष साळवे यांनी दिली ईट येथील समृद्धी नैसर्गिक शेतकरी गटाला भेट. यावेळी गटातील श्री रामप्रसाद डोईफोडे व सौं मंगल डोईफोडे यांनी आलेल्या सर्व मान्यवराचा सत्कार केला त्यानी केलेले शेतात विविध प्रयोग सगळे नैसर्गिक निविष्ट वापरून विषमुक्त शेतीचा ध्यास घेऊन खर्च कमी उत्पन्न जास्त कस होईल



याचा त्यानी ध्यासच जणू घेतला आहे विविध योजना फायदा घेऊन बाय ओ गॅस, जीवामृत डिकंपोजर, ब्राम्हस्त्र, अग्नी अस्त्र दशपरणी अर्क लिंबोळी अर्क यांचा वापर करून विविध पिकांना जैविक फवारणी करून मित्र किडीचे जतन व शत्रू किडीचे नियंत्रण केले, फार्मर कप मध्ये सहभाग घेऊन राज्यस्तरीय बक्षीस मिळाले आहे महाराष्ट्र शासन कडून सत्कार करण्यात येणार आहे कृषी विभाग पूर्ण पाठीशी आहे के व्ही के खामगाव यांचे सारखे मार्ग दर्शन लाभते अशा विविध ीचा वापर करून यंत्रिकी कारण उत्कृष्ट बियणाचा वापर करून विकर्मी उत्पन्न घेण्याचा माणसं करून दाखवला या गटातील सौं मंगल डोईफोडे यांचा सत्कार विभागीय सहसाचलक व कृषी विभाग यांनी त्याचा सत्कार केला या वेळी श्री सुनील वानखेड साहेब,श्री सुभाष ▶ उर्वरित पान २ वर





*वडवणी पोलीस स्टेशनच्या कर्तव्यदक्ष एपीआय वर्षा व्हगाडे- शिंदे मॅडम यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी मल्टीसर्विसेस येथे सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक बाप्पा मुळे, पांडुरंग आप्पा लांडे, शिवसेना शहराध्यक्ष शिवाजी दुटाळ, आत्माराम जमाले,या. सरपंच चंद्रकांत करांडे, बाळासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य महेश जाधव उद्धव काकडे, पत्रकार हनुमंत मात्रे, सौरभ खांडवे सर, रवि लांडे, पत्रकार संभाजी आदी उपस्थित होते.*

'दैनिक मराठवाडा पत्र'चे चौसाळा प्रतिनिधी
**श्री. प्रसाद (बाबू) देशमुख**
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुकः-
दैनिक मराठवाडा पत्र परिवार

**वाढदिवस अभिष्टचिंतन**




शुभेच्छुक: -
श्री.पांडुरंग छबूराव घरत(वडील), सौ.सुलोचना पांडुरंग घरत (आई)
समस्त घरत परिवार, महाजनवाडी,